
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः
सर्वे सन्तु निरामयाः

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक.

# जिव्हाळा

एक स्नेहबंध ....

वर्ष ४ थे अंक १३ वा
ऑक्टोबर २०१४



# श्रीगुरुजी रुग्णालयात अद्ययावत कॅन्सर किरणोपचार (Radiotherapy) विभागाची सुरुवात

या मशिनच्या सहाय्याने सर्व प्रकारच्या कॅन्सरचे उपचार शक्य आहेत. तसेच या मशीनद्वारे उपचार केल्यास किरणोपचाराचे दुष्परिणामही मोठ्या प्रमाणावर कमी होतात. अशा प्रकारचे उपकरण नाशिक व उत्तर महाराष्ट्रात प्रथमच आलेले आहे.




## अचूक किरणोपचार देण्यासाठी खालील प्रकारच्या उपचार पद्धती या उपकरणात उपलब्ध आहेत.

- 3 DCRT (3 डी सी आर टी) 3 Dimentional Conformal Radiotherapy.
- IMRT (आय एम आर टी) Intensity Modulated Radiotherapy.
- IGRT (आय जी आर टी) Image guided Radiotherapy.
- VMAT (व्ही मॅट) Volumetric modulated arc therapy.

### 1. लिनिअर ॲक्सलरेटर मशीन ( विशिष्ट अंतरावरून किरणांचा मारा करणे )

या मशिनच्या सहाय्याने सर्व प्रकारच्या कॅन्सरचे उपचार शक्य आहेत. तसेच या मशीनद्वारे उपचार केल्यास किरणोपचाराचे दुष्परिणामही मोठ्या प्रमाणावर कमी होतात. अशा प्रकारचे उपकरण नाशिक व उत्तर महाराष्ट्रात प्रथमच येत आहे.

### 2. ब्रेकीथेरपी मशीन ( जवळून किरणोपचार देणे )

ज्या अवयवाला कॅन्सर झाला आहे त्या भागामध्ये विशिष्ट प्रकारच्या सुया घुसविल्या जातात व त्यामधून किरणोपचार दिला जातो. काही प्रकारच्या कॅन्सरमध्ये अशा किरणोपचार पद्धतीचा उपयोग असतो. जसे गर्भाशय मुखाचा कॅन्सर इ.

**किरणोपचारासाठी आता कोणालाही मुंबईला किंवा इतरत्र जावे लागणार नाही. हे सर्व उपचार अर्थातच अतिशय कमी दरात आम्ही उपलब्ध करून देणार आहोत. तरी सर्व कॅन्सर रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा हे आवाहन.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय**
आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड,
नाशिक - ४२२०१३.
दूरध्वनी - २३४२४०१, २३४३४०१
मो. : ८३८००११२८६
**www.shrigurujirugnalaya.com**

# जिव्हाळा - त्रैमासिक

वर्ष ३ रे, अंक १३ वा, ऑक्टो. २०१४

मार्गदर्शक
डॉ. विनायक गोविलकर
संपादक
श्री रवींद्र बेडेकर (८३८००११२८४)
ravibedekar@yahoo.com
मुद्रक/प्रकाशक
श्री प्रवीण बुरकुले (९८२२०५७४९१)
कार्यवाह
श्रीगुरुजी रुग्णालय
**संपादक मंडळ**
श्री. प्रकाश भिडे
श्री. गजानन होडे
श्री. श्रीराम महाजन
डॉ. गिरीश बेद्रे
डॉ. अभिजित मुकादम
मोबाईल : ८३८००११२७८
abhizone3@gmail.com

अक्षरजुळणी, सजावट व मुद्रण
**अल्टीमेट इंप्रेशन्स,**
१९, विकास कॉलनी, इंडियन आईल
पेट्रोल पंपासमोर, त्रिंबक रोड, नाशिक.
फोन : ०२५३-२३५२५३०

**द्वैवार्षिक वर्गणी रु. १००/-**
**त्रैवार्षिक वर्गणी रु. १५०/-**
**या अंकाचे देणगी मूल्य रु. १५/-**

# संपादकीय ...

प्रिय वाचक बंधुंनो...

आपल्या जिव्हाळा त्रैमासिकाचा हा अंकही उशिरा निघत आहे याची बोच मनात आहे. रुग्णालयाच्या प्रमुख कामांची जबाबदारी सांभाळून अंक वेळेवर काढण्याची करामत अजून साधलेली नाही हे मान्य केले पाहिजे. खरे म्हणजे या निमित्ताने वाचकांना आम्ही आग्रहाचे आवाहन करतो की अंकाच्या कामात आपण आम्हाला सहकार्य करण्यासाठी पुढे यावे. अंकासाठी लेख, कविता मिळवणे, स्वत: लिहणे, प्रुफ रिडींग, पुस्तक परिचय सारख्या सदरासाठी लेखन अशी कामे करण्यासाठी इच्छुकांनी पुढे यावे व या महत्त्वाच्या कामात मदत करावी.

श्रीगुरुजी रुग्णालयात कर्करोगावरील प्रभावी रेडीयो थेरपी उपचाराची सुरवात होणार असल्याची माहिती मागील अंकात देण्यात आली होती. अनंतचतुर्दशीच्या शुभदिनी सर्व आवश्यक परवानग्या हे उपचार रुग्णालयात सुरू झाले आहेत. डॉ. गिरीश बेद्रे आणि रेडीयो थेरपीतील त्यांचे सर्व सहकारी सुसज्ज आहेत. आपल्या ध्येयवाक्याप्रमाणे वाजवी दरात हे उपचार गरजूंना उपलब्ध झाले आहेत. आसपासच्या निदान ७-८ जिल्ह्यातील रुग्णांना याचा लाभ मिळेल. मुंबईला जाण्याचा खर्च, तिथे राहण्याचा अतिरिक्त खर्च, त्यासाठी द्यावा लागणारा वेळ व नंबर मिळविण्यासाठीचा त्रास या सर्व दृष्टीने ही खुप मोठी सोय नाशिकला झाली आहे. आपण सर्वांनी आपल्या परिचीतांमध्ये हि वार्ता सांगावी व गरजु रुग्णांना आपल्या रुग्णालयात हे उपचार घेण्यासाठी उद्युक्त करावे. आपल्या परिचयातील डॉक्टरांना याची माहिती द्यावी.

ह्या सर्व धामधुमीत नित्याप्रमाणे आपली आरोग्य शिबीरे होत आहेत. त्यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. नुकतेच 'किडनी डे' निमित्त्य वार्षिक शिबीर घेण्यात आले.

**-- रवींद्र बेडेकर**

# सर्वश्रेष्ठ दान, मरणोत्तर देहदान

**लेखक : प्रो. डॉ. प्रशांत भुसारी**
विभाग प्रमुख शरीररचना शास्त्र विभाग
डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय

**१) देहदान** – जीवनात आपण आपल्या स्वेच्छेने विविध दान देतो. ज्याप्रकारे रक्तदान मृतवत शरीरामध्ये प्राण संचारण्याचे काम करते त्याप्रकारे देहदान हे वैद्यकीय अध्ययन व संशोधनासाठी जीवनदायी महादान ठरते. आज देहदान ही बदलत्या काळाची गरज आहे. सर्व दानापेक्षा "मरणोत्तर देहदान" हे सर्वश्रेष्ठ मानले जाते कारण ते एक नव्या युगाचे पवित्र पुण्यकर्म आहे. मृत्यूनंतर आपले शरीर दान करण्याची इच्छा संकल्पीत करणे व ती नातेवाईकांकडून पूर्ण करून घेण्याची व्यवस्था करून ठेवणे म्हणजेच देहदान होय.

**२) वयोमर्यादा** – १८ वर्षापुढील सर्व स्त्री व पुरुष कायद्याने मृत्यूनंतर देहदान करू शकतात. त्यासाठी जात/धर्म असा कोणताही भेद नाही. मृत्यूनंतर देहदान करण्याबद्दलच्या कायद्याच्या सर्व तरतूदी "Bombay Anatomy Act" मध्ये नमूद केलेल्या आहेत.

३) म.वि.प्र. समाजाचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयातील शरीररचनाशास्त्र विभागात सन १९९१ पासून देहदान स्विकारण्याची प्रक्रिया राबविली जाते.

**४) देहदानासाठी नोंदणी** – अ) ज्या व्यक्तीस मृत्यूनंतर देहदान करण्याची इच्छा असेल त्यांना मराठा विद्याप्रसारक समाजाच्या, डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात, शरीररचनाशास्त्र (Anatomy) विभागात नोंदणी करावी लागते. त्यासाठी –

अ) स्वसाक्षरीत भरलेले देहदान इच्छापत्र (Declaration Form for Body Donation) व

ब) दोन साक्षीदारासमक्ष भरलेले जवळच्या नातेवाईकाचे संमतीपत्र,

क) दोन पासपोर्ट फोटोसह शरीररचनाशास्त्र विभागात जमा करावे लागते.

**देहदान इच्छापत्र विभागामध्ये विनामूल्य मिळते.**

ब) शरीररचनाशास्त्र विभागाद्वारे आपणास देहदान नोंदणीपत्र (Body Donation Registration Card) दिले जाईल.

क) नोंदणी न करता अगदी मृत्यूशय्येवर जर एखाद्या व्यक्तीने देहदानाची इच्छा व्यक्त केली व त्या व्यक्तीचा मृत्यू नोंदणी करायच्या अगोदर झाला, तरीही देहदान स्वीकारले जाते. त्यासाठी फक्त मृतांच्या नातेवाईकांचे प्रतिज्ञापत्र व संमतीपत्र लागते.

**५) देहदानाची पद्धत** – अ) नैसर्गिक मृत्युनंतर ४ ते ६ तासांच्या आत मृतदेह वैद्यकीय महाविद्यालय, आडगांव, नासिक येथे आणण्याची व्यवस्था नातेवाईकांनी करावी. शरीररचनाशास्त्र विभागातर्फे ती

व्यवस्था करण्यात येते.

ब) मृतदेह आणताना देहदान नोंदणीपत्र व डॉक्टरांनी दिलेला विहीत नमुन्यातील मृत्यूचा दाखला घेऊन येणे बंधनकारक आहे. त्याशिवाय "देहदान" स्वीकारले जात नाही.

क) देहदान स्वीकारल्यानंतर पोचपावती व प्रमाणपत्र देण्यात येईल. मृतदेहास अत्यंत सन्मानाने वागविले जाईल याची ग्वाही नातेवाईकांना दिली जाते.

६) देहाची कोणत्याही प्रकारे विटंबना होणार नाही याची काळजी घेतली जाते आणि तो मृतदेह वैद्यकीय शिक्षणासाठी व संशोधनासाठी वापरण्यात येतो.

७) ज्या वैद्यकीय महाविद्यालयात देहदान नोंदणी अर्ज नोंदविला असेल तेथे देह नेऊन देणे सोईचे असते, परंतु काही अपरिहार्य कारणास्तव अन्य ठिकाणी मृत्यू झाल्यास जवळच्या कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करता येते.

८) देहदान केलेल्या देहाचा उपयोग खालील कारणांसाठी केला जातो.

अ) वैद्यकीय विद्यार्थ्यांना मानवी शरीराच्या रचनेचा (उदा. त्वचा, स्नायु रक्तवाहिन्या, मज्जातंतू हाडांची व इतर अवयवांची ठेवण) शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करण्यासाठी,

ब) विविध वैद्यकीय कार्यशाळासाठी (Workshops & CME)

क) पदव्युत्तर संशोधनासाठी,

ड) जिवंत देहावर न करता येणाऱ्या विविध शस्त्रक्रिया शिकण्यासाठी (Laproscopy) व वैद्यकीय उपचाराच्या अध्ययनासाठी,

ई) वैद्यकीय महाविद्यालयातील संग्रहालयात, (Museum)

९) सर्वसाधारण नैसर्गिक मृत्यूचा दाखला डॉक्टरांनी दिल्यावर देह स्वीकारला जातो. परंतु **खालील अवस्थेत मृतदेह स्वीकारले जात नाहीत.**

अ) अपघात झालेला, शव विच्छेदन (Post Mortem) केलेले,

ब) सांसर्गिक रोगाने मृत झालेला देह उदा. एडस्, कावीळ, कॉलरा, गँग्रीन वगैरे.

क) मृत्यूनंतर ६ तासांनी आलेला मृतदेह,

१०) दीर्घकाळ आजारी असलेल्या व्यक्तीचा देह लवकर कुजू लागतो, त्यामुळे डॉक्टरांच्या मताप्रमाणे त्यावर लगेचच अंत्यसंस्कार करणे आवश्यक असते अशा देहाचे देहदान करू नये.

**देहदानाचे पुण्यकर्म करून वैद्यकीय शिक्षण व संशोधनात मोलाचा वाटा उचलणाऱ्या देहदात्यांचे मनःपूर्वक आभार.**

देहदानासाठी व माहितीसाठी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

| अ.नं. | संपर्कासाठी फोन नं. | विस्तारीत क्रमांक |
|---|---|---|
| १. | ०२५३-२३०३८०२ | १२९१ |
| २. | ०२५३-२३०३९२३ | |
| ३. | ०२५३-२३०३९२५ | |
| ४. | ०२५३-२३०३१११ | |


❖❖❖

# Tonsils व Adenoids चे आजार

लेखिका : डॉ. सौ. प्राची डुबेरकर
ई.एन.टी. स्पेशालिस्ट
email : prachiduberkar@gmail.com

Tonsils अथवा Tonsillitis हा आजार काय आहे याची बहुतेकांना माहिती असते परंतू त्याची सविस्तर व शास्त्रोक्त माहिती नसल्यामुळे बरेच समज गैरसमज आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. प्रामुख्याने लहान मुलांना होणारा हा त्रास आहे. पण Tonsils चे आजार लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना होऊ शकतो.

Tonsils हे काय आहेत. Tonsils ह्या दोन Lymphoid Tissue च्या गाठी आहेत ज्या घश्याच्या प्रवेशद्वारावर असतात.




**Tonsils चे मुख्य काम म्हणजे -**

- हे रोगप्रतिकार शक्तीचे भाग आहेत. (Immune system)
- आपल्या शरीरात मुखाद्वारे अथवा नाकाद्वारे प्रवेश करणाऱ्या बाह्य जंतूंपासून व बाह्यघटकांपासून रक्षण करण्याचे मुख्य काम टॉन्सिल करतात.
- रक्तातील पांढऱ्या पेशी व Lymphnode, spleen तसेच Tonsils ही अवयव (Immune system) म्हणजेच रोगप्रतिकार शक्तीचे भाग आहेत. ते बाह्य जंतूंपासून अथवा बाह्य घटकांपासून संरक्षणासाठी आहेत.

**Tonsils चे आजार अर्थात Tonsilitis होण्याची मुख्य कारणे म्हणजे -**


1) Bacterial किंवा Viral infection जे आपल्याला सर्दीताप असताना होते. या जंतूसंसर्गामुळे सुजतात, आकाराने मोठे होतात आणि दुखतात.

Tonsillitis हे दोन प्रकारचे असते.

Acute Tonsillitis, Chronic Tonsillitis

**Acute Tonsillitis -**

* मुख्यत: ५-१५ वयोगटातील मुलांमध्ये आढळते.




सर्वसाधारणपणे लक्षणे अशी असतात.

- घसा दुखणे.
- गिळताना त्रास होणे.
- ताप, अंगदुखी थकवा.
- कान दुखणे.
- आवाजात जडपणा येणे.
- कानाखाली मानेवर गाठ येऊन ती दुखणे.


लहान मुलांमध्ये Tonsil बरोबर Adenoids ह्या Lymphoid tissue चेदेखील infection आढळते. ह्या दोन्हीचे इन्फेक्शन हे लहान मुलांमध्ये आजारी पडण्याचे मुख्य कारण आहे.

Adenoids हे सुद्धा एक प्रकारचे Lymphoid tissue असून ही गाठ नाकाच्या पाठीमागे Nasopharynr मध्ये असते. जेव्हा ही गाठ वाढते

आणि सुजते तेव्हा मुख्य लक्षणे दिसायला लागतात. ही ग्रंथी वयाच्या १३-१४ वर्षापर्यंत नाहीशी होते.

**Adenoids मुळे होणारी लक्षणे -**

- नाक बंद होणे




- घोरणे.
- तोंडाने श्वास घेणे.
- नाकातून रक्त येणे.
- ऐकण्यास कमी येणे.
- कानाचे Infection होणे.
- झोपेमध्ये लाळ गळणे.

Adenoid Focies हे देखील याचे लक्षण आहे. चेहऱ्यावर होणारा परिणाम म्हणजे Adenoid Facies

Adenoids चा मुख्य परिणाम कानांवर होतो जसे -

- कान गच्च वाटणे, ऐकू कमी येणे
- पडद्यामागे पाणी साठणे.
- पडदा आत खेचला जाणे.
- इतर

आता आपण Chronic Tonsilitis म्हणजे काय ते बघुया.

- हे वारंवार होणाऱ्या Tonsilitis मुळे होते. (Complication of Acute Tonsilitis)
- किंवा दिर्घकाल Subclinical infection मुळे होते.
- Chronic Sinusitis चा परिणाम म्हणून आढळू शकते.
- याची लक्षणे जवळजवळ आधी सांगितल्याप्रमाणेच आहेत. Tonsililtis मुळे काही Complications होऊ शकतात. Tonsils मध्ये पू भरून (Quinsy) टॉन्सिल खूप दुखू लागतात. अशा वेळेस पेशंटला शिरेतून इंजेक्शन देणे गरजेचे पडते. रुग्णालयात दाखल करून योग्य ती काळजी घ्यावी लागते. तसेच पेशंटचा श्वास कोंडत असेल अशी लक्षणे दिसू लागल्यास टॉन्सिल काढणे योग्य असते. याबरोबर अजूनही Complications होऊ शकतात जसे (Retropharyhgeal, Parapharyngeal, Cernical Abscess, tonsillolith) याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन वेळीच योग्य ते उपचार करणे गरजेचे आहे.

**Tonsils च्या पेशंटमध्ये ऑपरेशन करण्याची गरज केव्हा आहे ते बघूया.**

- Chronic Tonsililtis असल्यास (वारंवार त्रास होणे)
- श्वास घेण्यास त्रास होणे, (OSA) घोरणे
- कॅन्सरची शक्यता वाटल्यास, (हे प्रामुख्याने चाळीशीच्या पुढे होऊ शकते. दारू पिणे, तंबाखू खाणे कॅन्सरसाठी Risk factors आहेत.)
- Quinsy होऊन गेल्यास.
- Diptheria च्या Carriers मध्ये
- Rec. streptococcal tonsilitis
- लहान मुलांमध्ये Tonsils बरोबर Adenoids ची गाठसुद्धा काढली जाते. Tonsils चे ऑपरेशन्स नेहमी होणारी आहेत. ऑपरेशन्सनंतर एका दिवसात रुग्णाला घरी जाता येते. तसेच त्याचे धोकेही बरेच कमी झाले आहेत.

Tonsils व Adenoids मुळे होणारे Complications लक्षात घेतल्यास हा आजार डॉक्टरांना वेळीच दाखवून योग्य ते औषधोपचार केले पाहिजेत. Tonsils जरी शरीराच्या संरक्षणाचे काम करत असले तरी काही वेळेस त्यांचे ऑपरेशन करणे इष्ट असते.

◆◆◆

# चिंतनीय

"शाळेपासून मुक्ती - वर्षापुरती" हे पुस्तक मध्यंतरी वाचनात आलं. एक वेगळंच पुस्तक आहे हे. एका १६ वर्ष वयाच्या मुलाने लिहिलेलं. राहुल अल्वारिस त्याचं नावं. दहावी झाल्यानंतर इतर मुलांप्रमाणे पुढचं शिक्षण सुरू न करता त्यानं एक वर्ष वेगळ्या गोष्टी करण्याचं ठरविलं. शिक्षणाची आणि आयुष्याची जिवंत बाजू या त्याच्या 'सुट्टीत' त्यानं पाहिली. त्याचे अनुभव नक्कीच वाचण्यासारखे आहेत. त्यातला थोडा भाग पाँडेचेरीच्या अरविन्दाश्रमाच्या "आय क्लिनिक" मध्ये घेतलेल्या अभ्यासक्रमा संबंधी आहे. डोळ्यांची योग्य काळजी व व्यायाम याद्वारे दृष्टी कशी सुधारायची याचा तो अभ्यासक्रम आहे. पुस्तकातील तो उतारा पुढे जसाचा तसा देत आहे.

आश्रमाची इमारत जुनी होती. आत येण्यापूर्वी तुमची स्लिपर बाहेर काढून ठेवायचे. अनवाणी पायांनी आश्रमात चालायचं. एखाद्या रिट्रीट सेंटर मध्ये चिंतनाच्या मन:स्थितीत लोक येतात त्याची मला आठवण झाली. मंद भारतीय संगीत तिथे चालू असे.

पहिलाच व्यायाम भयानक होता. मी उन्हात सायकल मारत तिथे जाऊन पोहचलेला असे. तेव्हा माझ्या डोळ्यात मधाचे थेंब टाकले जायचे. मग मला एकीकडे घामाच्या धारा वाहत उन्हात उभं राहावं लागे. मधामुळे डोळ्यांची आग होत असायची. मध चवीला गोड पण डोळ्यात आग करणारा. पुढचा व्यायाम बारीक प्रिंट अंधारात फक्त मेणबत्तीच्या प्रकाशात वाचायचे. नंतर तोच व्यायाम बाहेर सूर्यप्रकाशात करायचा. एका लहान रबर बॉलचा उपयोग करून डोळ्यांच्या हालचाली कराव्या लागत. मग अक्षरांचा चार्ट वाचावा लागे. त्यावरची अक्षरे लहान- लहान होत जाणारी होती. नंतर डोळ्यांना वाफारा घ्यावा लागे, सर्दीसाठी नाकात घेतो तसा. मग थंडगार कापडी पट्ट्या डोळ्यावर ठेवायच्या. शेवटी रंगाचा उपचार. अंधाऱ्या खोलीत दिव्यावर परावर्तित झालेले गडद रंग टक लावून पहायचे.

प्रत्येक प्रकार ठराविक वेळा करायचा. डोळे उघडणे, बंद करणे, उघड-झाप करणे यावर पूर्ण ताबा हवा. दहा दिवसांच्या या उपचाराला फी नव्हती. पुढे वापरण्यासाठी लागणारं साहित्य तिथे घेता येतं. कोर्समुळे माझा नक्कीच फायदा झाला. महिन्याच्या अवधीत व्यायामानं मला वाचता येऊ लागलं. मी आताही हे व्यायाम करतो. त्याचा फायदा असा झाला की, मला आधी कायम चष्मा वापरावा लागे, आता फक्त विशिष्ट प्रसंगीच लागतो.

# ऑक्युपेशनल थेरपी - एक अनुभव

- सौ. अश्विनी रविंद्र शिंदे
९५२७५४९३००

'साहिल रविंद्र शिंदे' हा माझा सहा वर्षांचा मुलगा. २ एप्रिल, २००८ ला त्याचा जन्म झाला तेव्हा सगळे 'नॉर्मल' होते. त्याचे वजन, त्याची वाढ एकदम नॉर्मल मुलांसारखीच. पण हळूहळू जसं त्याचं वय वाढत गेलं तशी एक गोष्ट आमच्या लक्षात आली. ती म्हणजे त्याचं बोलणं. दोन वर्षांचा झाला तरी फक्त छोटे छोटे शब्दच तो बोलत होता आणि तेवढ्यावरच तो थांबला. पुढे त्याच्यात काहीच प्रगती होत नव्हती. आम्हाला काळजी वाटायला लागली. त्याच्याशी खूप बोलण्याचा आम्ही प्रयत्न केला पण त्याचा काहीच प्रतिसाद नव्हता. आम्ही त्याला शाळेत टाकले, वाटले आतातरी तो इतर मुलांमध्ये राहून बोलण्याचा प्रयत्न करेल. पण तसे झाले नाही.

मग आम्ही बालरोग तज्ज्ञ डॉ. शर्मिला कुलकर्णी यांचा सल्ला घेतला. तेव्हा त्यांनी स्पीच थेरपीचा सल्ला दिला. तसेच त्यांच्या सल्ल्याने आम्ही मुंबई येथे डॉ. प्रजेश उदानी यांनादेखील कन्सल्ट केले आणि त्यांनी पण स्पीच थेरेपीचा सल्ला दिला.

त्यानंतर आम्ही नाशिकला परत येऊन डॉ. कुलकर्णींच्या सल्ल्याने सनशाईन चाईल्ड सेंटरमध्ये जाऊ लागलो. तेथे श्रीमती कृपा ॲन्थनी यांच्याकडे त्याची स्पीच थेरेपी चालू केली. तेथे त्याला शब्दांचा उच्चार कसा करायचा हे शिकविले गेले. आणि त्याच्या कन्सेप्ट क्लीअर करण्यावर भर दिला गेला. त्याला रोज एक तास असे तीन महिने ही थेरेपी चालू होती. आता तो थोडे थोडे शब्द बोलू लागला. पण त्याची कॉन्सनट्रेशन आणि लिहिण्यात काहीच प्रगती होत नव्हती. या कालावधीतही आम्ही आपल्या परीने सर्व उपाय करून बघितले. म्हणजे अगदी, पोपटाचा उष्टा पेरू खाऊ घालण्यापासून मुंबईच्या चाईल्ड स्पेशालिस्टपर्यंत सगळं करून झालं. हे सर्व करत असताना त्याची शाळा सुरू होती. आणि तिथेही आम्हाला खूप अडचणी येत होत्या. आम्ही निराश होऊन जायचो.

मग आम्ही श्रीमती कृपा ॲन्थनी यांच्या सल्ल्याने डॉ. अभिजित मुकादम, श्रीगुरुजी रुग्णालय यांना भेटलो. मग डॉ. अभिजित यांच्या सल्ल्यानुसार मी त्याची ऑक्युपेशनल थेरेपी सुरू केली. ही थेरेपी जवळपास दोन वर्षे केली. वेळोवेळी डॉ. अभिजित यांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले. कारण आम्ही डॉ. अभिजित यांची तळमळ रोज अनुभवायचो. ते आम्हाला खूप धीर द्यायचे. नेहमी थेरेपी चालू ठेवण्याबद्दल सांगायचे. कारण बरेचसे पालक ही थेरेपी मध्येच सोडून देतात.

डॉ. अभिजित यांच्या सांगण्यानुसार आम्ही दोन वर्षे नियमितपणे थेरेपी घेतली. आणि आज साहिल व्यवस्थितपणे इतर मुलांसारखा खूप बडबड करतो. छान लिहितो, अभ्यासातही प्रगती आहे. आता त्याचे उपचारही बंद झाले आहेत. हे सगळे शक्य झाले ते डॉ. अभिजित यांच्या प्रयत्नाने, तळमळीने व आत्मीयतेने केलेल्या उपचारामुळे. या प्रवासात त्यांनी आम्हाला खूप धीर दिला. त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

या प्रवासात आम्हाला खूप मुलं आणि त्यांचे पालक भेटले. बऱ्याच जणांना वाटते की लगेच फरक पडावा. पण तसे नसते. ऑक्यूपेशनल थेरेपीद्वारे होणारी प्रगती ही मुलांवर अवलंबून असते. मुलांचा मुड बघून त्यांना शिकविण्यात येते. हळूहळू त्यांच्याकडून काही गोष्टी करून घेतल्या जातात. या सर्व गोष्टींना वेळ द्यावा लागतो तसेच सातत्यही आवश्यक आहे. तरच त्याचा चांगला परिणाम दिसून येतो.

❖❖❖

# घडामोडी

१. दि. १३ एप्रिल २०१४ रोजी रुग्णालयात नाक, कान, घसा (ENT) च्या रुग्णांचे शिबीर संपन्न झाले. या शिबीरात डॉ. सौ. प्राची डुबेरकर यांनी ५३ रुग्णांची तपासणी केली.

२. पिंपळगाव बसवंत येथे बाजार दिवसानिमित्त दि. १३ व २७ एप्रिल रोजी मोफत रुग्ण तपासणी शिबीर झाले. त्यात अनुक्रमे ३१ व ३३ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

३. दि. १४ एप्रिल रोजी रुग्णालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. भोसला मॅनेजमेंट कॉलेजचे प्रा. संजयजी साळवे हे प्रमुख वक्ते होते. या कार्यक्रमास उपस्थित रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, समिती सदस्य, कर्मचारी व रुग्णांचे नातेवाईक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नम्र अभिवादन केले.

४. दि. २० एप्रिल रोजी दिंडोरी येथे बाजार दिवसामध्ये शिबीर संपन्न झाले. यात १८ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली व औषधेही दिली गेली.

५. दरी व मुंगसरा या दोन गावी मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू तपासणी शिबीर दि. २५ एप्रिल रोजी झाले. एकूण ४९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ११ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले. ३ रुग्णांच्या शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात करण्यात आल्या.

६. दि. २९ एप्रिल रोजी रुग्णालयात मोफत अस्थमा शिबीर घेण्यात आले. डॉ. रेवती चिटको व डॉ. हर्षल पिळोदेकर यांनी २४ रुग्णांची तपासणी केली. सर्व रुग्णांची 'व्हायब्लोग्राफ' तपासणी मोफत करण्यात आली.

७. दि. ४ मे रोजी रुग्णालयात मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर घेण्यात आले. २९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील ३ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले.

८. दि. ३१ मे व १ जून रोजी नाशिक येथे 'सहकार भारती'चे प्रांत अधिवेशन झाले. अधिवेशनासाठी प्रतिनिधी आले होते. त्यांना रुग्णालयाद्वारे २ दिवस ॲम्ब्युलन्स सेवा पुरविण्यात आली. तसेच रुग्णालयाचे डॉ. गिरीश बेद्रे (कॅन्सर तज्ज्ञ) यांनी प्रतिनिधींसमोर रुग्णालयाच्या कार्याच्या माहितीचे सादरीकरण केले.

९. दि. ११ जून रोजी व्यंकटेश बापट चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने उपनगर कॅनाल रोड इंदिरानगर झोपडपट्टी (सेवावस्ती) येथे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू तपासणी शिबीर घेण्यात आले. एकूण ७२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. १२ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात बोलविण्यात आले. ८ रुग्ण आले त्यापैकी २ रुग्णांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच पुढे दि. १९ जून रोजी विष्णुनगर स्टेशनवाडी, नाशिक रोड येथे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू तपासणी शिबीर संपन्न झाले. एकूण ७३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. २ रुग्णांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या.

१०. दि. २२ जून रोजी खुटवडनगर येथे श्री. प्रदीप पेशकार (भाजप उद्योजक आघाडी प्रमुख) यांच्या सहकार्यातून मोफत १) नेत्ररोग, २) अस्थिरोग व ३) स्त्रीरोग तपासणी शिबीर घेण्यात आले. रुग्णालयाचे डॉ. धनंजय देशमुख, डॉ. सुप्रिया देवरे, डॉ. विलास पाटील व डॉ. विक्रांत मुंगी यांनी रुग्णांची तपासणी


केली. १२५ नेत्ररोग रुग्ण, ६५ स्त्रीरोग रुग्ण आणि ५५ अन्यरोग रुग्णांची तपासणी करण्यात आली.

११. २९ जून रोजी रुग्णालयाच्या आवारात श्रमदान करून सर्व परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आला. या श्रमदानात रुग्णालयाचे सेवाव्रती कर्मचारी, डॉक्टर्स व शिवगिरी हास्यक्लबचे सदस्य सहभागी झाले होते व सर्वांनी श्रमदानाचा आनंद लुटला. हास्यक्लबचे सदस्य, गंगाजल नर्सरीचे मालक श्री. पी. के. पाटील यांनी श्रमदानासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून दिले.

मे व जून २०१४ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे -

- अखिल भारतीय प्रचार प्रमुख मा. श्री. मनमोहनजी वैद्य,
- अखिल भारतीय सेवा विभाग प्रमुख मा. श्री. सुहासराव हिरेमठ,
- अखिल भारतीय धर्मजागरण प्रमुख मा. श्री. मुकुंदराव पणशीकर आणि
- क्षेत्रीय धर्मजागरण प्रमुख मा. शरदराव ढोले तसेच श्री. निशिकांत आहेर (प्रेसिडेंट सी. आय. आय.) यांनी रुग्णालयाला भेट दिली.

# भावपूर्ण श्रद्धांजली



श्रीगुरुजी रुग्णालयाच्या देणगीदार कै. कृष्णाबाई सदाशिव धामणकर यांचे दि. 6 जुलै 2014 रोजी सकाळी 6.45 मिनिटांनी दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो ही प्रार्थना !!!

## गत तीन महिन्यांतील देणगीदारांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती सीमा प्रभाकर टिकेकर | मुंबई | सौ. मंगला अशोक कुलकर्णी | नाशिक |
| श्री. संजय माधव लेले | मुंबई | श्री. कैलास सखाराम शेवाळे | नाशिक |
| महावीर प्रसाद बाबुनंदा अत्तरवाले ट्रस्ट | मुंबई | श्री. निळकंठ तुकाराम ढाके | नाशिक |
| जव्हेरी फिस्कल सर्व्हिस लि. | मुंबई | श्री. अनंत अथनी | नाशिक |
| पेरिविंकल फॅशन्स प्रा. लि. | मुंबई | एम. ॲण्ड एम. इंडस्ट्रिज | नाशिक |
| अरविंद डी. नवरे | मुंबई | डॉ. हेडगेवार स्मारक सेवा निधी | पुणे |
| श्री. अरविंद श्रीधर जोशी | ठाणे | श्री. चेतन संपत गायकवाड | पुणे |
| श्री. प्रसाद अशोक कुलकर्णी | नाशिक | श्री. नरेंद्र चेतन गायकवाड | पुणे |
| श्री. प्रशांत एस. कुलकर्णी | नाशिक | सौ. रत्नमाला जी. गायकवाड | पुणे |
| सखी मंडल | नाशिक | सौ. निशा एम. गुप्ते | पुणे |
| श्री. अविनाश एस. भानू | नाशिक | श्री. अरुण गजानन गोगटे | पुणे |
| सौ. गौरी जयंत देशमुख | नाशिक | श्री. शरद पाठक | पुणे |
| श्रीमती मालती प्रभाकर ठाकूर | नाशिक | श्री. हेमंत व्ही. पाठक | पुणे |
| श्री. वसंत दातार | नाशिक | श्री. संजय भास्कर पाठक | पुणे |
| श्री. घनश्याम डी. मेढे | नाशिक | श्री. अरविंद साने | पुणे |
| श्री. बी. के. यार्दी | नाशिक | श्री. शिरीष मधुकर ओतुरकर | कोल्हापूर |
| श्री. मकरंद बी. दाणी | नाशिक | श्री. श्रीकांत एम. नाईक | गोवा |
| श्री. अरुण विष्णु फाळके | नाशिक | डॉ. श्री. तेजानंद अनिल गणपते | चिपळूण |

# श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक - हेल्थ चेकअप पॅकेजेस्

## Fast Lab (Basic - Health Check up) Rs. 400/-

1) CBC
2) BSL - F
3) Urine Routine
4) Serum Cholesterol level
5) Serum Triglyceride
6) Serum HDL
7) Blood Pressure Measurement.

## Whole Body Checkup : Rs. 1400/-

a) Complete blood count
b) ESR
c) Blood Sugar Level (Fasting)
d) Urine Routine
e) Stool routine
f) Proteins
g) Blood Urea
h) Serum Creatinine
i) Lipid Profile
j) Serum Billirubin
k) X-ray Chest
l) ECG
m) Ultrasonography abdomen
n) Eye Check up - Free
o) Physician Check up

## Package for Hypertensive Patient Rs. 1900/-

| | |
|---|---|
| a) Complete blood count | 4 times in a year |
| b) ECG | 4 times in a year |
| c) Blood Sugar Level (Fasting) | Once |
| d) Blood Sugar Level (Postmeal) | Once |
| e) Lipid Profile | 2 times in a year |
| f) Serum Creatinine | 2 times in a year |
| g) Urine Routine | 2 times in a year |
| h) Physician's advice | 4 times in a year |
| i) Eye Check up - Free | |

## Package for Diabetic Patients : Rs. 2300/-

| | |
|---|---|
| a) Blood Sugar Level (Fasting) | 5 times in a year |
| b) Blood Sugar Level (Postmeal) | 5 times in a year |
| c) Complete blood count | 2 times in a year |
| d) ECG | Once |
| e) Serum Creatinine | 2 times in a year |
| f) Blood Urea | 2 times in a year |
| g) Urine Routine | Once |
| h) Urine Microalbumin | 2 times in a year |
| i) Glycosylated haemoglobin | 2 times in a year |
| j) Lipid Profile | Once |
| k) Physician's advice | 5 times in a year |
| l ) Eye Check up - Free | |

## सूचना :-

- एकदा भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.
- पॅकेजमध्ये नमूद केलेल्या तपासण्यांखेरीज अन्य कोणत्याही तपासण्यांची गरज असेल किंवा इतर कोणती सुविधा घेतली तसेच डॉक्टरांच्या ठरविलेल्यापेक्षा जास्त भेटी घेतल्यास त्याचे वेगळे पैसे आकारण्यात येतील.
- आपल्याला रुग्णालयाच्या वेळा व नियम पाळणे बंधनकारक आहे.
- डॉक्टरांच्या उपलब्धतेनुसारच आपली तपासणी होईल.
- कृपया अपॉइंटमेंट घेऊनच तपासणीस यावे त्यामुळे आपली गैरसोय होणार नाही.
- तपासणी करण्यापूर्वी १२ तास काहीही खाऊ व पिऊ नये. यावेळेत धुम्रपान व मद्यपान टाळावे व सकाळी रुग्णालयात तपासणीसाठी यावे.
- जर आपल्या पॅकेजमध्ये लघवी व संडास तपासणी करण्याचे असेल तर सकाळी येताना लघवी व संडासचा नमुना सोबत घेऊन यावा. त्यासाठी लागणारे साहित्य रुग्णालयातून घेऊन जावे.
- आपणास काही आजार असेल व त्यासाठी काही औषधे आपण घेत असाल तर ती औषधे ठरलेल्या वेळेतच थोड्या पाण्याबरोबर घ्यावीत व आजाराची कागदपत्रे व माहिती डॉक्टरांना द्यावी.
- जर आपण ठरलेल्या वेळेत येणार नसाल तर तसे आधीच रुग्णालयात कळवावे.
- जर आपण आपल्या कंपनीतर्फे आरोग्य तपसणी करण्यास आला असाल तर तसे कंपनीचे पत्र सोबत आणावे.

## नोट :-

- सार्वजनिक सुट्टी व रविवार सोडून तपासणीची वेळ घेता येईल.
- पॅकेजेस्चे दर कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय बदलू शकतात



भाजप उद्योग आघाडीच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या खुटवडनगर येथील तपासणी शिबिरात बोलताना डॉ. देशमुख सोबत उद्योग आघाडीचे प्रदेश संघटक प्रदीपजी पेशकार

LEFT
NOT KNOWN
REFUSED
DECEASED
UNCLAIMED
RTN. TO SENDER



व्यंकटेश बापट चॅरिटेबल ट्रस्ट, विष्णूनगर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेले नेत्ररोग तपासणी शिबीर




**वाजवी दरात योग्य उपचार**

ह्या प्रकल्पासाठी दिलेली देणगी आयकर अधिनियम ८० जी व अधिनियम ३५ ए.सो. अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहे.
कृपया देणगीचा धनादेश अथवा डी.डी. श्रीगुरुजी रुग्णालय (८० जी करीता) किंवा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान (३५ ए.सी करीता) या नावाने काढावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक**
आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.
दूरध्वनी - २३४२४०१, २३४३४०१
मो. : ८३८००११२८६
website - www.shrigurujirugnalaya.com

प्रिंटेड मॅटर - बुक-पोस्ट
प्रति,
Smt. Meenakshi Prasad
R-4/4, Govardhan Giri, Bangur Nagar,
Goregaon (W), Mumbai – 400090